Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# संत साहित्याच्या मुख्य प्रवाहाचा शोध

**प्रा.डॉ.श्रीहरी रामराव धोंड**
मराठी विभाग
राष्ट्रमाता इंदिरागांधी महाविद्यालय, जालना.

**प्रस्तावना** – संतसाहित्य हे मध्ययुगात जन्माला आले. त्यात नव्या जाणिवांची चिन्हे, दिसू लागली. त्यामुळे समाजमनाच्या एका मोठ्या भागाशी संतसाहित्यचे नाते अतुट आणि अभिन्नत्वाचे आहे. धर्मजीवन हेच मध्ययुगात लोकजीवन होते. धर्म हीच जीवनाची प्रेरणा व धर्माचरण हीच जीवनपध्दती होती. त्यामुळे संत साहित्य हे धर्मजीवनाचा, समाजजीवनाचा आणि संस्कृतिक जीवनाचा इतिहास ठरतो.

मध्ययुगात आध्यात्मिक प्रेरणतूलन पद्य आणि गद्य जन्माला आले. गद्याच्या तुलनेत पद्य अधिक काळ टिकले. गद्याचे स्वरुप तात्कालीन, प्रासंगिक राहीले लीळा, व बखरींचा किरकोळ अपवाद आहे. तुलनेने संताचे साहित्य हा मध्ययुगीन जनमानसावर अधिराज्य गाजविणारा प्रवाह ठरला ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी, नामदेवाची अभंगवाणी, एकनाथाचे एकनाथी भागवत, भारुडे, गौळण, कबीराची वाणी, तुलसीदासाची रामचरितमान, रामदासांची करुणाष्टके आणि मनाचे श्लोक व तुकोबाची अभंगवाणी जनमानाला पडलेली मोहिनी होती. मध्ययुगात विशेषत्वाने संत लोकांच्या श्वास बनले. मध्ययुगात निर्माण झालेल्या अन्य वाङमयप्रकारापेक्षा, अध्यात्मसंबध पंडिती साहित्यपेक्षा संताची कविता लोकप्रियता ठरली म्ळणून संत साहित्य हाच मध्ययुगीन साहित्याचा मुख्य प्रवाह ठरतो.

## संतसाहित्य

आजवर संतसाहित्याचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास झाला. संत आणि संतसाहित्य यावर अनेकांनी संशोधन करुन जाडजूड ग्रंथ लिहिले. आजवर झालेला संतसाहित्याचा अभ्यास हा चिकित्सेच्या अंगाने झाला. त्यातून विविध ग्रंथाच्या संशोधीत संताच्या कवितेने वाङमयीन मुल्यमापन करण्याचही प्रयत्न झाला. संत साहित्यातील तत्वज्ञानाचेही विवेचन

झाले. धार्मिक भूमिकेतून श्रध्दायुक्त अंतःकरणाने पारायने झाली. आजही ही घाऊक प्रमाणावर होत असतात. इथल्या प्रबोधनपरंपरने संत आणि समाज यांचा संबध जिवंत ठेवला. आत्मा ईश्वर, मोक्ष, भक्ती इत्यादी आध्यात्मिक अंगानीही संत साहित्याचे व्यापक परिशीलीन झाले हे सारे होत असतांना संताकडे, त्यांच्या जीवनकार्याकडे, निरपेक्षपणे आणि तटस्थतेने पाहिले जाण्याची उदाहरणे क्वचीत आहेत. संतांच्या अभ्यासात अभिनिवेश हा भाग आहे. संताचे प्रबोधन, त्यांची तत्वदृष्टी आणि त्यांचे कल्याणकार्य अशी अनेकविध रुपे या विषयात आहेत. मात्र या रुपांना न्याय मिळालाच नाही. त्यामुळे संतांच्या कार्याची फलश्रुती मांडण्याचे प्रयत्न अपुरे पडले. आजवरच्या अभ्यासातल्या ह्या सर्व त्रुटी भरुन काढून संत साहित्याला खरा न्याय देण्याची ताकद फक्त संत साहित्याच्च्या चिकित्सक अभ्यासतच आहे. म्हणून संत साहित्याचया रुपाने स्वरुप समजावून घेण्यासाठी संत साहित्याच्या अभ्यासाची नितांत आवश्यकता आहे. कारण संत साहित्याच्या मूल्यमापनाची मांडलेली प्रमेये संत साहित्याच्या अंतरंग तपासून पाहता येतील.

**संतसाहित्याची अध्यात्मिक बाजू.**

संत साहित्याचा आशय त्यातील तत्वज्ञानात्मक आणि आध्यात्मिक, विचार. बहुतेक संतकवी उच्च दजाचे साधक असण्याबरोबरच महान तत्ववेतेही होते. विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या सनातन सत्याचा शोध संतानी घेतला आहे. ब्रम्ह, माया, जीवन, जगत, जगदीश आणि मोक्ष हे संताच्या चिंतनाचे मूलभूत विषय राहिले आहेत. संतांनी आत्मचिंतन करतांना परमसत्याच्या प्राप्तीच्या प्रयत्न केला. आहे.

**संत साहित्याची समाजिक बाजू**

संत साहित्याच्या निर्मितीमागे बुडते हे जन न देखवे डोळा म्हणून कळवसा येतसे ही भावनाही विशेषत्वाने कार्यरत होती. संतानी समकालीन समाजाचे सुक्ष्म निरिक्षण केले. समाजाचे गाडे रुढींच्या चिखलात रुतले आहे हे त्यांच्या ध्यानी आले. समाजाच्या स्थितीतीचे निरिक्षण करीत त्यांनी धर्माचे ईश्वराचे आकलन समाजापुढे ठेवले. संत हे धार्मिक विचारवंत होते पण त्यापेक्षाही अधिक ते लोशिक्षक होत. सगुण निगुर्ण एक

गोविंदाच आहे असे सांगून अध्यात्माच्या बाह्यावडंबराचा निषेधकेला. कर्मकांडाची निंदा केली पंढरीच्या वाळवंटापुरती का असेना सामाजिक-आध्यात्मिक लोकशाही स्थापन केली. एकता समता आणि ममतेचा संदेश दिला.

**संत साहित्याची भावनिक बाजू**

संताच्या संवेदनशील मनाचा अविष्कार संतसाहित्यातून तपासून पाहता येतो. संताच्या ठिकणी वसणारी सर्व भूतांबद्दलची प्रेमभावना तर तिचे ईश्वराबद्दलची प्रेमभावना अभिव्यक्त होतांना दिसते. कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे. म्हणनारे तुकाराम मधुराक्तीत रंगून गेलेले ज्ञानदेव, कीर्तनात नाचनारे नामदेव. रुढीवर कोरडे ओढणारे एकनाथ यांची भावनिक्ता महत्वाची आहे. सगळेच संत हे कुणाला ना कुणालातरी वाट पुसणारे आहे. त्यामुळे आशयाचा शोध घेतांना संतावर असलेला तत्वज्ञांनाचा विचारांचा आणि पारंपारिक तत्वज्ञानांचा असणारा प्रभाव पहावयास मिळतो.

**विविध मतप्रणालींचा प्रभाव**

संतसाहित्याचे एक समान वैशिष्ट्य म्हणजे संतावर कोणत्या ना कोणत्या सत्पुरुषाचा, गुरुचा व विशिष्ट विचारधारेचा प्रभाव झालेला आहे. भारतीय भक्तिसाहित्याचा पाया ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची रचना करुन भाष्यकारांना वाट पुसल्याचे दिसते. तर गुरुपरंपरेने नाथपंथी असलेल्या ज्ञानदेवांची आदिनाथ शिवाऐवजी वैष्णव परंपरेतील विठ्ठलाला आराध्य दैवत म्हणून स्विकार केला. हा बदल मतप्रणालीच्या प्रभावातूनच झाला असला पाहिजे. ज्ञानेश्वरी लेखन करणारे ज्ञानदेव आणि अंभगातील ज्ञानदेव वेगळे वाटतात ते या प्रभावातील बदलामुळेच. ज्ञानाचा एका म्हणजे एकनाथ व नाम्याचा तुका या युक्तीप्रमाणे सगुणोपासना, निर्गुणोपासना. भक्तीच्या प्रांतात मतामतांचा प्रचंड गलबला आहे. संतावर असलेल्या विविध मतप्रवाहांच्या प्रभावातूनच संताची वाङमयीन विठ्ठलमूर्ती घडली आहे. संतांनी त्यांच्यावर विविध मतप्रणालीचा प्रभाव आपल्या विशाल व्यक्तिमत्वात कसा जिरवून टाकला, कशा सहजतेने त्यांनी ही मते हाताळली, कसा सारासार विचार केला. याचा अभ्यास संताच्या साहित्यातून होऊ शकतो. मध्ययुगात

भारतीय समाजमनाचे आध्यात्मिक धार्मिक आणि नैतिक भरणपोषण करणाऱ्या संतांनी तत्कालीन धर्मजीवनाला आकार देण्याचा प्रयत्न केला. नाथसंप्रदायाचा संतावर विशेष प्रभाव आहे. नाथासंप्रदायाचे अध्वर्यू गोरक्षनातांनी मध्ययुगीन भारतीय धर्मप्रेरणेला आकार दिला. कर्मकांडी अवडंबराव आघात केला. त्यातून उत्तराकलीन महापुरुषांच्या जीवनकार्याच्या प्रेरणा निश्चित झाल्या. गोरक्षनाथांचा विराट आत्मा चक्रधरांच्या नाडीतून वाहतो आहे. ज्ञानेश्वरांच्या श्वासातून दरवळतो आहे. संतवाणीतून गंगेसारखा धावतो आहे. डॉ. ढेरेंच्या याविधानाचे सुंदर उदाहरण आहे. भावार्थ रामायण लिहून रामोपासना करणारे नाथ गुरुपरंपरेने दत्त सांप्रदायिक, आचाराने भागवत सांप्रदायिक आणि ज्ञानदेवांच्या प्रभावाने नाथ सांप्रदायिक ठरतात. संत साहित्याच्या अभ्यासातूनच अनेक प्रश्नांचा उलगडा होईल. ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरांनी लिहिलेली गीता टीका आहे अशा अनेक गीताटीका अनेकांनी लिहिल्या आहेत. ज्ञानेश्वरी हे गीताभाष्य आहे. संतांनीही गीतातत्वाचे स्वतंत्रपणे रचनेत अनुसरण केलेले आढळते. गीताभाष्याचे ही साधर्म्यसाठी वैधर्म्यांसाठी तपासता येतील. मराठी आध्यात्मिक संस्कृतीचे केंद्रबिंदू म्हणून ज्ञानेश्वराचे तत्वविचार याचा शोध घेता येतो.

संतमंडळीनी पूजलेल्या दैवतांला सगळ्या संताची एकतर सगुणोपासक किवां निर्गुणीपासक अशी दोन रुपे करता येऊ शकेल. मराठी परंपरेत सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही उपासकांना अशीच संज्ञा आहे. नामदेव यांना भक्तकवी संतकवी म्हटले आहे. सगुणोपासकांचा भर मुर्तीपुजेवर होता. श्रीविठ्ठलाचे रुपात अभिव्यक्ती होते. संतानी परमेश्वराचे रुप वर्णितांना रामकृष्ण ही नामभिधाने ईश्वरातत्वाचे द्योतक म्हणून वापरली आहेत. तेथे रामायणातील राम आणि महाभारतातील श्रीकृष्ण अभिप्रेत होतेच असे म्हणता येते.

दैवतांच्या रुपशोधात संशोधन मुद्दा श्री विठ्ठलाच्या संबधात संभवतो. मुळात भक्तांचे आंदोलन दक्षिणेमधून उत्तरेकडे सरकत गेले. वैष्णव आळवार आणि शैव नायनमार संतांनी लावलेली ही भक्तीची धारा उत्तरेत सरकातांना त्या त्या प्रदेशाची रुपवैशिष्ट्ये

आपल्यात जिरवत गेली. कानडा, करनाटकू विठोबा मराठमोळा झाला तो अशाच स्वीकार प्रक्रियेतून, विठ्ठलाबद्दल सविस्त विवेचन डॉ. रा.चिं.ढेरेंनी केले आहे. भक्त नामदेव हे विठ्ठलभक्त पंजाबात गेल्यावरही ते विठ्ठलभक्ती विसरले नव्हते. परंतू श्रीगुरु ग्रंथसाहेबांतील नामदेव निर्गुणोपासक आहेत. उत्तरेतील नामियांना मंडळीत विठ्ठलाबद्दल अनादर नसला तरी त्यांच्याकडून विठ्ठलाची पुजाही होत नाही हे तथ्य इथे लक्षात घेतले की, दैवतांच्या रुपशोधाच्या अनेक दिशा दिसू लागतात. संतसाहित्याचा ह्या अंगाने तौलनिक अभ्यास झाला तर अनेक आजवर न आकळलेली सत्य आणि तथ्ये समोर येऊ शकतील.

**संतकविता आणि पंडिती कविता. :**

मराठी कवितेच्या प्रांतांत कवीची संत पंत आणि तंत अशी तीन प्रकारांत विभागणी केली जाते. संत साहित्य आणि पंडिती वळणाचे साहित्य ह्यात समान सुत्र हे की दोन्ही प्रकारच्या रचनांमागे धर्म ही प्रधान प्रेरणा आणि भक्ती हे प्रमुख सूत्र दिसते. त्यामुळे पंडिती कवितेचा विचार संत्राच्या बरोबर करावा का हा प्रश्न उभा राहू शकतो. अर्थात धर्म ही प्रेरणा आणि भक्ती हे सुत्र समान असले तरी दोघांच्या वाङमयनिर्मितीमागील भूमिकेत मुलभूत फरक आहे. पंडिती कवितेत संतत्वाच्या काही खुणा कुठे कुठे दिसत असल्या तरी त्यात उत्कटतेपेक्षा कारागिरीचा भाग अधिक आहे. पंडित कवींनी मुख्यत्वे संस्कृत कवितेचा आदर्श समोर ठेवून त्या धतीवर आणि त्या कथानकांनुसार रचना केली. आपली बहुश्रुतता आपले पांडित्य आणि आपले रचनाकौशल्य दाखविण्यासाठी त्यांनी अलंकारिकता आणि भाषिक चमत्कृतीचा आश्रय घेतला. त्यामुळे पांडिती कविता पुराणाश्रयी कीर्तनपरंपेचा आधार आणि अभिव्यक्तीचा कच्चा माल बनली. पंडितांच्या तुलनेत संताची कविता अधिक उत्कट, अधिक नैसर्गिक आणि लोकभाषेचा आश्रय करणारी आहे. पंडितांची कविता ही विशेरूकरुन ब्राम्हणांसाठी तर संताची कविता सर्वसामान्यांसाठी आहे. वेदांचा अधिकार नसलेल्यांसाठी संतांनी शोधलेला पर्याय म्हणजे वेदांतत्वाचे अनुसरण करणारे संत साहित्य सगळे पंडितकवी ब्राम्हण आहेत तर संत अठरापगड जातीतून आणि सर्व सामाजिक स्तरांतून आले होते. ही लक्षणीय आहे.

संताची आणि पंताची कविता ही अशा विविध अंगानी तपासून पाहण्यासारखी आहे. प्रेरणा, प्रवृत्ती, निर्मिती प्रक्रिया, आशय रचनेचा आकृतिबंध, भाषा निवेदनपध्दती, व्यक्तीचित्रण अशा अनेक निकषांवरही संत आणि पंताची कविता यांची तुलना हो/ शकते. शाहीरांची रचनाही काही प्रमाणत अध्यात्मसंबध आहे. त्या अंगानेही तुलनास होऊ शकेल. म्हणून संत साहित्य हे समाज जीवनाचा सामान्य माणसाच्या जगण्याचा पाया आहे.

**संदर्भ :-**

१. प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास - अ.ना. देशपांडे
२. प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास - ल.रा.नशीराबादकर
३. प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास - रा.श्री. जोग
४. प्रवचनसार - डॉ. गणेश वासुदेव नगारे
५. अधुनिक मराठी वाङमयाची सांस्कृतिक पार्श्वभुमी - मेहता पब्लिकेशन पुणे.